पोलीस पत्रिका पोलिस अधिक्षक दिनांक : 18/01/2016
क्रमांक 03 लोहमार्ग नागपूर 22/01/2016

क्रमांक : पोअलोना/आस्था–4/गॅझेट/1544 **A**/2016 नागपूर दिनांक 14/02/2016

## भाग–1

## कायमस्वरुपी आदेश

## भाग–2

## रजा

क्रमांकः–पोअलोना/आस्था–2/विनावेतन/683 /2016 नागपुर दिनांक. 19/01/2016

:–आदेशः–

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा सिक गैरहजर कालावधी विनावेतन रजेत मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पो.कर्म.चे नाव/हुद्दा | नेमणुक | कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/1136 निखीलेश खरे | मुख्यालय | दि. 11.11.15 ते 17.11.15 पर्यंत | 07 दिवस विनावेतन रजा |
| 2 | मपोशि/793 शारदा पिपरोल | रेपोस्टे नागपूर | दि. 16.10.15 ते 17.10.15 पर्यंत | 02 दिवस विनावेतन रजा |
| 3 | मपोशि/802 रत्नमाला कटरे | रेपोस्टे नागपूर | दि. 02.10.15 ते 07.10.15 पर्यंत | 06 दिवस विनावेतन रजा |
| 4 | मपोशि/882 राजश्री डाईफोडे | रेपोस्टे नागपूर | दि. 12.10.15 | 01 दिवस विनावेतन रजा |

क्रमांकः–पोअलोना/आस्था–2/विनावेतन/682 /2016 नागपुर दिनांक. 19/01/2016

:–आदेशः–

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा सिक गैरहजर कालावधी विनावेतन रजेत मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पो.कर्म.चे नाव/हुद्दा | नेमणुक | कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/1048 विजय यादव | भुसावळ | दि. 26.04.15 ते 10.05.15 पर्यंत | 15 दिवस विनावेतन रजा |

क्रमांकः–पोअलोना/आस्था–2/विशेष रजा/596 /2016 नागपुर दिनांक. 18/01/2016

:–आदेशः–

पोशि/640 उमेश भुरले, नेमणुक रेपोस्टें गोंदिया यांच्या पत्नीचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया दिनांक 23.12.2015 रोजी झाल्याने पोशि/640 यांना शासन निर्णय क्रमांक हअरजा/2498/01/सेवा–0, दिनांक 20.03.1998 अन्वये 07 दिवस विशेष रजा मंजुर करण्यात येत आहे.

क्रमांकः–पोअलोना/आस्था–3/सिक कालावधी/684/2016 नागपुर दिनांक. 19/01/2016

:–आदेशः

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा सिक कालावधी वैधकीय कारणास्तव अर्जीत/परावर्तीत मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पो.कर्म.चे नाव/हुद्दा | नेमणुक | कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/11सचिन घुरडे | भुसावळ | दि.06.04.2015 ते 09.06.201 | 65 दिवस परावर्तीत रजा |
| 2 | पोशि/1079नितीन सोमकुवर | मनमाड | दि.11.09.2015 ते 19.09.2015 | 09 दिवस परावर्तीत रजा |
| 3 | पोहवा/925बागु सोनवने | ना. रोड | दि.07.10.2015 ते 14.10.2015 | 08 दिवस परावर्तीत रजा |
| 4 | पोशि/911मनिष तळखडे | नंदुरबार | दि.28.05.2015 ते 18.06.2015<br>दि.19.06.2015 ते 22.06.2015 | 22 दिवस परावर्तीत रजा<br>04 दिवस अर्जीत रजा |
| 5 | पोशि/1165 अमित ढोरे | नंदुरबार | दि.22.07.2015 ते 14.08.2015 | 24 दिवस परावर्तीत रजा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | पोशि/770निलेश अथम | नांदेड | दि.29.07.2015 ते 07.08.2015 | 10 दिवस परावर्तीत रजा |
| 7 | पोशि/995चरणसिंग राठोड | औरंगाबाद | दि.16.10.2015 ते 14.11.2015 | 30 दिवस परावर्तीत रजा |
| 8 | मपोशि/1151श्वेता दमके | औरंगाबाद | दि.11.11.2015 ते 25.11.2015 | 15 दिवस परावर्तीत रजा |
| 9 | मसफौ/953 मंदा कोल्हे | म. सेल | दि.27.11.2015 ते 21.12.2015 | 25 दिवस परावर्तीत रजा |
| 10 | पोशि/1069तुषार राजनकर | बिडीडीए, | दि.14.10.2015 ते 20.11.2015 | 38 दिवस परावर्तीत रजा |
| 11 | पोशि/1179मुश्ताक शेख | पो. मुख्या | दि.24.11.2015 ते 03.12.2015 | 10 दिवस अर्जीत रजा |
| 12 | प्रमपोशि/279जेबा पठाण | पो मुख्या | दि.18.12.2015 ते 27.12.2015 | 10 दिवस अर्जीत रजा |
| 13 | प्रमपोशि/748प्रिति सरोदे | पो. मुख्या | दि.13.12.2015 ते 20.12.2015 | 08 दिवस अर्जीत रजा |

क्रमांकः—पोअलोना/पशा—1/परावर्तीत रजा/676/2016 नागपुर दिनांक. 19/01/2016

:—आदेशः

क.श्रे.लि. श्रीमती विद्या वाणी नेमणुक पत्रव्यवहार शाखा पोलीस अधीक्षक लोहमार्ग नागपूर यांची प्रकुती ठिक नसल्याने त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे दिनांक 11.12.2015 ते 11.01.2016 परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

क्रमांकः—पोअलोना/पशा—1/परावर्तीत रजा/776/2016 नागपुर दिनांक. 21/01/2016

:—आदेश

श्रीमती शोभा लोही, वश्रेली. नेमणुक आस्थापना शाखा, पोलीस अधीक्षक, कार्यालय लोहमार्ग नागपुर यांना वैद्यकीय कारणास्तव दिनांक 01.01.2016 ते 04.01.2016 पर्यत 04 दिवस परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

क्र:पोअलोना/पशा—५/पोनि—भांबल/अ.रजा/६७२/२०१६, नागपूर, दि १९.०१.२०१६

**आदेश**

पोलीस निरीक्षक, श्री. सी.डी.भांबल, नेम. रे.पो.स्टे.नाशिकरोड यांची शासन निर्णय क्रं. एलव्हिई/२००२/प्रक्र—५६४/पोल ५ (ब) दि. २७.०२.२००४ अन्वये सन २०१५—१६ या वित्तिय वर्षाकरिता १५ दिवस समर्पित रजा (रोखीकरण)व ३० दिवस अर्जित रजा ही रजेवर जाणेपुर्वी पोलीस अधिक्षक यांची परवानगी घेतील या अटीवर रजा मंजूर करण्यात येत आहे.

## भाग—3

## बदली/पदोन्नती/कार्यमुक्त

क्रमांकः— पोअलोना/आस्थापना/पदोन्नती/पोना — पोहवा /2016 752 नागपूर, दि 20/01/2016

## आदेश

खालील नमूद पोलीस नायक यांना, रूपये 5,200—20,200/— या वेतनबॅन्ड मधील रू. 2400/— या ग्रेड वेतनामधून रू. 2400/— या ग्रेड वेतनामध्येच आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पोलीस हवालदार रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांना पोलीस हवालदार पदाच्या पदोन्नतीनंतर रु. 480/— ऐवजी रू. विशेष वेतन 500/— अनुदेय राहील.

| अ. क्र. | पोलीस हवालदाराचे हूद्दा, ब. क्र. व नांव | सध्याची नेमणूक | प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | पोना/185 विलास जाधव | रे.पो.स्टे. मनमाड | अजा | अजा |
| 2 | पोना/147 आनंदा धांडे | स्था.गु.शा. भुसावळ | इमाव | खुला |

कमांकः–पोअलोना/आस्थापना/पदोन्नती/पोशि –पोना/2016 751 नागपूर, दि. 20/01/2016

–: आदेश :–

खालील नमूद पोलीस शिपाई यांना तसेच त्यांचे पैकी अ.क. 1 अन्वये दर्शविण्यात आलेल्या पोलीस कर्मचारी यास मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष हक्क याचीकेच्या आदेशाच्या अधिन राहुन, रूपये 5,200–20,200/– या वेतनबॅन्ड मधील रू. 2000/– या ग्रेड वेतनामधून रू. 2400/– या ग्रेड वेतनामध्येच आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पोलीस नायकांच्या रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांना पोलीस नायक पदाच्या पदोन्नतीनंतर रु. 500/– ऐवजी रु. 480/– विशेष वेतन अनुदेय राहील.

| अ. क. | पोलीस शिपायांचा हूद्दा, ब. क. व नांव | सध्याची नेमणूक | प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/390 वाल्मीक कदम | रेपोस्टे इगतपुरी | अजा | अजा |
| 2 | पोशि/778 श्रीकृष्ण निकम | रेपोस्टे अकोला | इमाव | खुला |

कमांकः–पोअलोना/आस्थापना/पदोन्नती/पोशि –पोना/2016 751 नागपूर, दि. 20/01/2016

–: आदेश :–

खालील नमूद पोलीस शिपाई यांना तसेच त्यांचे पैकी अ.क. 1 अन्वये दर्शविण्यात आलेल्या पोलीस कर्मचारी यास मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष हक्क याचीकेच्या आदेशाच्या अधिन राहुन, रूपये 5,200–20,200/– या वेतनबॅन्ड मधील रू. 2000/– या ग्रेड वेतनामधून रू. 2400/– या ग्रेड वेतनामध्येच आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पोलीस नायकांच्या रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांना पोलीस नायक पदाच्या पदोन्नतीनंतर रु. 500/– ऐवजी रु. 480/– विशेष वेतन अनुदेय राहील.

| अ. क. | पोलीस शिपायांचा हूद्दा, ब. क. व नांव | सध्याची नेमणूक | प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशि/390 वाल्मीक कदम | रेपोस्टे इगतपुरी | अजा | अजा |
| 2 | पोशि/778 श्रीकृष्ण निकम | रेपोस्टे अकोला | इमाव | खुला |

कमांक :– पोअलोना/आस्थापना/बदली–2016/2016– 687 नागपूर दिनांक 19/01/2016

–:: आदेश ::–

महाराष्ट्र शासकीय कर्मचा–यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा–या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील नियम 4 (4) अन्वये तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क. एनसीपी 1008/2/प्र.क.6/पोल–3, दिनांक 25/07/2008, शासन निर्णय गृह विभाग क. टिआरएन– 0110/प्र.क.488 पोल–5 ब दिनांक 23/04/2010 आणि पोलीस महासंचालक यांचे पत्र क. पोमसं/3/अधिसूचना/14/2014/73 दिनांक 25/02/2015 अन्वये सन 2015 मध्ये महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले अध्यादेश क. 2 नुसार दिलेले निर्देशाप्रमाणे पोलीस कर्मचा–यांच्या त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांची विनंती नुसार बदली करण्यात येत आहे.

| अ.क. | हुद्दा, ब.नं. व नांव | कोठुन | कोठे |
|---|---|---|---|
| 1 | मसपोउपनि/79 विजया मेलफेदवार | रेपोस्टे औरंगाबाद | रेपोस्टे नांदेड |
| 2 | पोहवा/472 उत्तम कांबळे | रेपोस्टे परळी | रेपोस्टे नांदेड |

कमांक : पोअलोना/पशा–5/उपविपोअ–पवार/816/2016, नागपूर, दिनांक 22.01.2016

आ दे श

श्री. गौतम पांडुरंग पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग मनमाड हे पुढील आदेशापर्यंत उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग जालना या रिक्त पदाचे काम पाहतील.

<u>आदेश क्र.2</u>

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वासुदेव आर.देसले नेम. स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग भुसावळ यांना या कार्यालयाचे आदेश क्र. पोअलोना/पशा–5/पोनि–देसले/कार्यभार/324/2016 दिनांक 11.01.2016 अन्वये उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग जालना या रिक्त पदाचा सोपविण्यात आलेल्या अतिरिक्त कार्यभारातुन या आदेशाद्वारे मुक्त करण्यात येत आहे.

क्रमांक : पोअलोना/पशा–५/पोनि–पान्हेकर/उपविअधि–कार्यभार/३८२/२०१६ नागपूर दिनांक १२.०१.२०१६

**–: आदेश :–**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अभय आर.पान्हेकर, नेम. रेल्वे पोलीस स्टेशन नागपूर हे उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग नागपूर या रिक्त पदाचे पुढील आदेशापर्यंत काम पाहतील.

**–: आदेश २ :–**

पोलीस निरीक्षक श्री. जी.एच.यादव नेम. मानव संसाधन विभाग लोहमार्ग नागपूर यांचेकडे या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअलोना/पशा–५/उपविपोअधि–अति.कार्यभार/निवसेनि/ ८८७/२०१५ दिनांक २९.०१.२०१५ अन्वये उपविभागीय पोलीस अधिकारी लोहमार्ग नागपूर या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आले होते त्यांना या आदेशाद्वारे अतिरिक्त कार्यभारातुन **मुक्त** करण्यात येत आहे.

क्रमांक :पोअलोना/पशा–5/पोनि–पोउपअधि–पदो.(मानगावकर)/कार्यमुक्त/490/2016 नागपूर दि.14.01.16

संदर्भ :–1)शासन आदेश, गृहविभाग, क्र.रापोसे–1315/प्र.क्र.234/पोल 1(अ) दि.31.12.2015
2)पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/2/1020/निःशस्त्र निवडसूची 2014–15/23/2015 दि. 31.12.2015
3)शासन आदेश, गृहविभाग, क्र.रापोसे–1715 प्र.क्र.1(1)/पोल 1(अ) दि.12.01.2016

**–: आदेश :–**

पोलीस निरीक्षक श्री. दिलीप दिनकर मानगावकर, यांना संदर्भिय क्र. 1 व 2 च्या आदेशानुसार पोलीस उप अधिक्षक पदाची तात्पुरत्या स्वरूपात लोहमार्ग नागपूर जिल्हयाचे आस्थापनेवर पदोन्नती देण्यात आलेली असुन त्यांनी पोलीस उप अधिक्षक पदाची दि. 06.01.2016 रोजी मा.नंतर पदोन्नती स्वीकारलेली आहे.

संदर्भिय क्र 3 व पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे आदेश क्र. पोमसं/2/1020/निःशस्त्र निवडसुची 2014–15/23/2015 दि. 13.01.2016 अन्वये लोहमार्ग नागपूर जिल्हयाच्या आस्थापनेवरील पोलीस उप अधिक्षक श्री. दिलीप दिनकर मानगावकर, यांची सहा.पोलीस आयुक्त बृहन्मुंबई येथे पदोन्नतीवर नवीन नियुक्ती करण्यात आल्याने त्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता या जिल्हयाच्या आस्थापनेवरून दिनांक 15.01.2016 रोजी मा.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

<u>आदेश क्र. 2</u>

पोलीस उप अधिक्षक श्री. दिलीप दिनकर मानगावकर, नेम. रे.पो.स्टे.नांदेड यांच्या रिक्त होणा–या पदी पोलीस निरीक्षक श्री. वासुदेव आर. देसले नेम. स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग भुसावळ .हे पुढील आदेशापर्यंत आपले कामाव्यतिरिक्त त्यांचे काम पाहतील.

क्रमांक : पोअलोना/पशा–5/पोनि–पोउपअधि–पदो.(धारिया)/कार्यमुक्त/491/2016 नागपूर दि. 14.01.16

संदर्भ :–1)शासन आदेश, गृहविभाग, क्र.रापोसे–1315 प्र.क्र.234/पोल 1(अ) दि.31.12.2015
2)पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/2/1020/निःशस्त्र निवडसूची 2014–15/23/2015 दि. 31.12.2015
3)शासन आदेश, गृहविभाग, क्र.रापोसे–1715 प्र.क्र.1(1)/पोल 1(अ) दि.12.01.2016

**–: आदेश :–**

पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद मनोहर धारिया, यांना संदर्भिय क्र. 1 व 2 च्या आदेशानुसार पोलीस उप अधिक्षक पदाची तात्पुरत्या स्वरूपात लोहमार्ग नागपूर जिल्हयाचे आस्थापनेवर पदोन्नती देण्यात आलेली असुन त्यांनी पोलीस उप अधिक्षक पदाची दि. 07.01.2016 रोजी मा.पुर्वी पदोन्नती स्वीकारलेली आहे.

संदर्भिय क्र 3 व पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे आदेश क्र. पोमसं/2/1020/निःशस्त्र निवडसुची 2014–15/23/2015 दि. 13.01.2016 अन्वये लोहमार्ग नागपूर जिल्हयाच्या आस्थापनेवरील पोलीस उप अधिक्षक श्री. प्रसाद मनोहर धारिया, यांची सहा.पोलीस आयुक्त बृहन्मुंबई येथे पदोन्नतीवर नवीन नियुक्ती करण्यात आल्याने त्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता या जिल्हयाच्या आस्थापनेवरून दिनांक 15.01.2016 रोजी मा.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

**आदेश क्र. 2**

पोलीस उप अधिक्षक श्री. प्रसाद मनोहर धारिया, नेम. रे.पो.स्टे.औरंगाबाद यांच्या रिक्त होणा–या पदी सहा.पोलीस निरीक्षक श्री. भगवान दशरथ कांबळे नेम. रे.पो.स्टे.औरंगाबाद हे प्रभारी अधिकारी म्हणुन काम पाहतील.

क्र.: पोअलोना/पशा–5/सपोनि–ठाकुर/ता.पदो.बदली–कार्यमुक्त/489/2016 नागपूर दिनांक 14.01.16

**–: आदेश :–**

पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे आदेश क्र. पोमसं/3/11/6/पोनि.पदो(2014–15) प्रलंबित प्रकरणे/285/15 दि.13.01.2016 अन्वये सहा.पोलीस निरीक्षक श्री. दिलीप श्रावण ठाकुर यांची पोलीस अधिक्षक लोहमार्ग नागपूर या जिल्हयाचा आस्थापनेवरून पोलीस अधिक्षक वर्धा येथे ''कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांका पासून '' (पोलीस निरीक्षक) या पदावर तात्पूरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आल्याने त्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीच्या ठिकाणी रूजू होण्याकरिता या जिल्हयाच्या आस्थापने वरुन दि. 15/01/2016 रोजी मा.नंतर पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे.

## भाग–4

## बक्षिस

क्रमांक : आर/23/बक्षिस/ 802 /2016 नागपूर. दिनांकः– 21.01.2016

**–: आ दे श :–**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0684/सी.आर.–24/पोल–10 दिनांक 26.6. 1996 मधील अधिकाराचा उपयोग करुन तसेच गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0694 सी.आर. 24/पोल–10 दिनांक 30.8.1996 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस 'सी' नोट/जीएसटी सह मंजुर केले आहे.

'कामगिरी' :–

यातील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस मुख्यालय लोहमार्ग नागपूर येथे दि. 05.11.2015 रोजी भेट दिली असता भेटी दरम्यान सन्मान गार्डचे वेळी उत्तम गणवेष परीधान करुन चांगला टर्न आउट ठेवले आहे. त्यांच्या या उत्कृष्ठ कामगीरी बद्दल प्रोत्साहनार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा–यांची नावे/हूद्दा/ब.नं. | नेमणूक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1. | रापोनि/श्री. सुधाकर ढुमणे | लोह. पो. मुख्यालय नागपुर | रू. 750/– व 'सी' नोट |
| 2. | पोशि/1178 रंगारी | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |
| 3. | पोशि/146 काळे | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |
| 4. | पोशि/511 रामटेके | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |
| 5. | पोशि/704 सुरनार | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |
| 6. | पोशि/736 गायधने | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |
| 7. | पोशि/653 घरतकर | ––––––''–––––– | रू. 250/– व जीएसटी |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | पोशि/732 बाविसताले | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 9. | पोशि/118 पाथोडे | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 10. | पोशि/236 वानखेडे | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 11. | पाशि/462 चेपटे | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 12. | पोशि/555 शेंडे | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 13. | पोशि/488 जगनित | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 14. | पोशि/680 गोंडेकर | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 15. | पोशि/189 गौतम | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 16. | पोशि/27 मुन्नासिंग | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 17. | पोशि/73 चंदेल | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 18. | पोशि/669 पवार | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 19. | पोशि/167 सेलोटे | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 20. | पोशि/180 देशमुख | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |
| 21. | पोशि/668 राठोड | ------''------ | रू. 250/- व जीएसटी |

**क्रमांक : आर/23/बक्षिस/ 799 /2016 नागपूर. दिनांकः- 21.01.2016**

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0684/सी.आर.-24/पोल-10 दिनांक 26.6.1996 मधील अधिकाराचा उपयोग करुन तसेच गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0694 सी.आर. 24/पोल-10 दिनांक 30.8.1996 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस 'सी' नोट/जीएसटी सह मंजुर केले आहे.

'कामगिरी' :-

यातील नमुद अधिकारी/कर्मचारी यांनी दि. 21.01.2015 ते 23.01.2015 रोजी शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे यांचे वार्षिक निरीक्षणा करीता नागपुर लोहमार्ग पोलीस जिल्हयातील शस्त्राची दुरुस्ती, ऑइलिंग, क्लिनिंग, प्रिझरवेशन करुन शस्त्रे सुस्थितीत निरीक्षणा करीता ठेवून शस्त्रे दाखविण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कामगीरी बद्दल प्रोत्साहनार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे____

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा-यांची नावे/हूद्दा/ब.नं. | नेमणूक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1. | रापोनि/श्री. सुरेश गवई, | लोह. पो. मुख्यालय नागपुर | रू. 'सी' नोट |
| 2. | रापोउपनि/श्री. राजेश सरोदे | ------''------ | रू. 'सी' नोट |
| 3. | सपोउपनि/967 मडावी | ------''------ | रू. 500/- व जीएसटी |
| 4. | सपोउपनि/36 क्षत्रिय | ------''------ | रू. 500/- व जीएसटी |
| 5. | पोहवा/604 खंडारे | ------''------ | रू. 350/- व जीएसटी |
| 6. | पोहवा/901 वानखेडे | ------''------ | रू. 350/- व जीएसटी |
| 7. | पोना/540 जगनिक | ------''------ | रू. 350/- व जीएसटी |
| 8. | पोशि/412 खिरटकर | ------''------ | रू. 350/- व जीएसटी |

**क्रमांक : आर/23/बक्षिस/ 801 /2016 नागपूर. दिनांकः- 21.01.2016**

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0684/सी.आर.-24/पोल-10 दिनांक 26.6.1996 मधील अधिकाराचा उपयोग करुन तसेच गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0694 सी.आर. 24/पोल-10 दिनांक 30.8.1996 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस 'सी' नोट/जीएसटी सह मंजुर केले आहे.

'कामगिरी' :–

यातील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी पोलीस मुख्यालय लोहमार्ग नागपूर येथील मेनगेट ते मा. पोलीस अधिक्षक कार्यालय पर्यत असलेल्या रस्त्याचे बाजुला एल.ई.डी लाईट लावण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कार्यालयात सतत पाठपूरावा करुन एल.ई.डी. लाईट बसविण्यात आले. त्यांच्या या उत्कृष्ठ कामगीरी बद्दल प्रोत्साहनार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| क्र. | अधिकारी/कर्मचा–यांची नावे/हूद्दा/ब.नं. | नेमणूक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1. | रापोनि/श्री. सुधाकर ढुमणे | लोह. पो. मुख्यालय नागपुर | रू. 1000/– व 'सी' नोट |
| 2. | सपोउपनि/699 पवार | ––––––''–––––– | रू. 1000/– व जीएसटी |
| 3. | पोशि/1059 खंडार | ––––––''–––––– | रू. 400/– व जीएसटी |

क्रमांक : आर/23/बक्षिस/ 798 /2016 नागपूर. दिनांकः– 21.01.2016

–: आ दे श :–

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0684/सी.आर.–24/पोल–10 दिनांक 26.6.1996 मधील अधिकाराचा उपयोग करुन तसेच गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0694 सी.आर. 24/पोल–10 दिनांक 30.8.1996 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस 'सी' नोट/जीएसटी सह मंजुर केले आहे.

'कामगिरी' :–

यातील नमुद कर्मचारी यांनी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस मुख्यालय लोहमार्ग नागपूर येथे दि. 05.11.2015 रोजी भेट दिली असता भेटी दरम्यान बॅन्ड पथक मधील वाजंत्री पोलीस कर्मचारी यांनी सन्मान गार्डचे वेळी उत्तम गणवेष परीधान करुन चांगला टर्न आउट ठेवून उत्कृष्ठ असे बॅन्ड चे वादन केले त्यांच्या या उत्कृष्ठ कामगीरी बद्दल प्रोत्साहनार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचा–यांची नावे/हूद्दा/ब.नं. | नेमणूक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1. | पोहवा/604 खंडारे | लोह. पो. मुख्यालय नागपुर | रू. 500/– व जीएसटी |
| 2. | नापोशि/84 सकट | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 3. | पोशि/568 खंडारे | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 4. | पोशि/602 मिश्रा | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 5. | पोशि/762 कलाणे | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 6. | पोशि/1172 तायडे | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 7. | पोशि/772 भेंडे | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 8. | पोशि/609 विजयवार | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |
| 9. | पाशि/965 तातेवार | ––––––''–––––– | रू. 500/– व जीएसटी |

क्रमांक : आर/23/बक्षिस/457 /2016 नागपूर. दिनांकः–14.01.16

–: आ दे श :–

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0684/सी.आर.–24/पोल–10 दिनांक 26.6.1996 मधील अधिकाराचा उपयोग करुन तसेच गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीओआर/0694 सी.आर. 24/पोल–10 दिनांक 30.8.1996 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना बक्षिस 'सी' नोट/जीएसटी सह मंजुर केले आहे.

'कामगिरी' :–

यातील नमुद अधिकारी/कर्मचारी यांनी मा. अपर पोलीस महासंचालक लोहमार्ग, म.रा. मुंबई यांनी सनं 2015–16 या कालावधीचे नागपुर लोहमार्ग जिल्हयाचे दिनांक 14.12.2015 ते 16.12.2015 या कालावधीत घेतलेल्या

वार्षिक निरीक्षकणाचे वेळी आपले दैनंदिन कामकाज सांभाळुन वेळेपेक्षा जास्त वेळ कार्यालयात थांबुन अथव परिश्रम घेवुन वेळेच्या आंत संगणकावर अचुक सादरीकरण करून बैठकीचे वृत्तांत तयार करून सादर केले आहे. यांच्या या उत्कृष्ठ कामगीरी बद्दल प्रोत्साहानार्थ खालील प्रमाणे बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचा–यांची नावे / हूद्दा / ब.नं. | नेमणूक | बक्षिस |
|---|---|---|---|
| 1. | पोउपनि / श्री.विठ्ठल तडस | वाचक शाखा, लोह नागपुर | रू 1000 / –व 'सी' नोट |
| 2. | पोहवा / 296 झुरमुरे | ––––––"–––––– | रू 500 / –व जीएसटी |
| 3. | मपोशि / 307 रिनके | ––––––"–––––– | रू 500 / –व जीएसटी |
| 4. | पोशि / 1150 सोनटक्के | ––––––"–––––– | रू 500 / –व जीएसटी |
| 5. | पोशि / 980 सोनारे | ––––––"–––––– | रू 500 / –व जीएसटी |

भाग–5

## गणवेश भत्ता

क्रमांक : पोअलोना / पशा–5 / गणवेष भत्ता / पोनि–भांबल / 468 / 2015, नागपूर दिनांक 14. 01.16

–: आदेश :–

खालील नमूद पोलीस निरीक्षक यांना शासन निर्णय क्रमांक युएनएफ–1204 / 2492 / प्र.क्र.–22 / पोल–4 दिनांक 30.6.2006 अन्वये तसेच शासन निर्णय गृहविभाग क्र. एनएफ / 0290 / 2560(14) / पोल–4 दिनांक 15.09.1992 आणि पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र.16 / 3520 दिनांक 16.12.1993 मधील सुचनांचे अधिन राहून सन 2015–2018 या चार गट वर्षाकरीता 5000 / – रू. (अक्षरी रूपये पाच हजार फक्त) गणवेष अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिका–यांचे नाव व हूद्दा | नेमणूक |
|---|---|---|
| 1 | पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत डी.भांबल | रे.पो.स्टे. नाशिकरोड |

सदरचा खर्च महाराष्ट्र शासन गृहविभाग परिपत्रक क्र.युएनएफ–0290 / 2560 (14) / पोल–4 दिनांक 20.10.1993 अन्वये षिर्ष 2055 पोलीस 111 रेल्वेज नागपूर या शिर्षाखाली टाकण्यात यावा व तो वित्तिय वर्ष 2015–2016 करिता मंजुर अनूदानातून भागविण्यात यावा.

## भाग–6

## शिक्षा

क्रमांक : पोअलोना / आस्था–2 / सपोनि–सिंह / 650 / 2015, नागपूर दिनांक 18.01.16

–: आदेश :–

सपोनि / संजय सिंह नेमणुक रेपोस्टे गोंदिया यांनी सदर प्रकरणी स्पष्टीकरण सादर केले असुन समाधानकारक असल्याने या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअलोना / आसथा–2 / सपोनि–सिंह / कसुरी / 9395 / 2015 दिनांक 29.10.2015 अन्वये दिलेली एक वर्ष वार्षिक वेतनवाढ स्थगीतीची शिक्षा देण्याबाबतचे कारणे दाखवा नोटीसची शिक्षा रद्द करुन " **सक्त ताकीद**" ही शिक्षा देण्यात येत आहे.

महाराष्ट् शासन
विभागीय चौकशी
लोहमार्ग पोलीस दल

# आदेश

क्रमांकः—पोअलोना/विचौ/सफाई कामगार/मोगरे/2015 नागपूर दि. /01 /2016

विषयः— सफाई कामगार श्रीमती लता धनराज मोगरे, नेमणूक मुख्यालय, लोहमार्ग, नागपूर यांचे कसूरी संबंधात विभागीय चौकशी

——— 0000 ———

अत्यंत आक्षेपार्ह,, शासकीय नोकरास अत्यंत अशोभनिय असे कर्तव्याप्रती अनास्था दर्शविणारे वर्तन की ज्यात, सफाई कामगार श्रीमती लता धनराज मोगरे, हयांनी त्या मुख्यालय, लोहमार्ग, नागपूर येथे सफाई कामगार म्हणून नेमणुकीस असतांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट—1 मध्ये दर्शविलेले कसूर केले आहे, म्हणून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याइतपत प्रथम दर्शनी पुरावा उपलब्ध असल्याची माझी खात्री झालेली आहे.

म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 मधील तरतुदीनुसार, मी अनंत रोकडे, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर सक्षम अधिकारी म्हणुन सफाई कामगार श्रीमती लता धनराज मोगरे यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश देत आहे.

सदर विभागीय चौकशी चालविण्यासाठी ठाणेदार, लोहमार्ग, नागपूर यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे. त्यांनी विभागीय चौकशी नियमाचे काटेकोरपणे पालन करुन ही चौकशी 02 महिन्यांचे आंत पूर्ण करुन चौकशीची कागदपत्रे त्यांच्या समारोप अहवालासह (दोन प्रतीत) सक्षम अधिका—याकडे अंतिम आदेश काढणेकामी पाठवावीत.

विभागीय चौकशीत अपचा—यावर ठेवावयाचे दोषारोपपत्र, अभिकथन पत्र, सरकारी साक्षदारांची यादी व सरकारी कागदपत्रांची यादी (मुळ कागदपत्रांसह) सोबत पाठविण्यात येत आहे. कागदपत्र प्राप्त झाल्याची पोच दयावी. सोबत जोडलेले अपचा—यावर ठेवावयाचे दोषारोपपत्र, अभिकथन पत्र, सरकारी साक्षदारांची यादी व सरकारी कागदपत्रांची यादी अपचा—याला तामिल करावी. अपचा—याला सदर कागदपत्र तामिल केल्यानंतर जादा प्रतीवर त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घेवून जादा प्रत विभागीय चौकशीचे कार्यवाहीस्तव आपल्या कार्यालयात सुरक्षीत ठेवावी. अपचा—यास दोषारोपपत्र अदा झाल्याची तारीख या कार्यालयास कळवावी. चौकशीची कार्यवाही तात्काळ सुरू करावी. चौकशी सत्वर पूर्ण करून चौकशी अहवाल या कार्यालयात सादर करावा. चौकशी पूर्ण होईपर्यंत चौकशीचा प्रगती अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा. समारोप अहवाल सादर करतांना अहवालाच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करावी. समारोप अहवालात शिक्षेबाबत कुठलाही उल्लेख करू नये. शिक्षेबाबतच्या शिफारशीबाबत शिफारशीचे स्वतंत्र गोपनिय पत्र सादर करावे.

प्रतः— सफाई कामगार श्रीमती लता धनराज मोगरे, नेमणूक मुख्यालय, लोहमार्ग, नागपूर

**मार्फत :—** ठाणेदार, लोहमार्ग, नागपूर तथा विभागीय चौकशी अधिकारी

2/— यांना याद्वारे असा निर्देश देण्यात येत आहे की, सदरहु कागदपत्रे प्राप्त झाल्यापासुन 10 दिवसांचे आत आपले लेखी बयानाचे निवेदन परस्पर चौकशी अधिकारी यांचेकडे सादर करावे. तसेच आपले म्हणणे व्यक्तीशः मांडण्याची आपली ईच्छा असेल तर तसेही नमुद करावे. आपणास असेही कळविण्यात येते की, जे दोषारोप आपण कबुल केले नाहीत, तेवढया दोषारोपाच्या बाबतीतच फक्त चौकशी केल्या जाईल. म्हणून प्रत्येक दोषारोप विनिर्देशपूर्वक कबूल अथवा नाकबूल करावा. आपणास असेही कळविण्यात येते की, आपण विहीत मुदतीत बचावाचे लेखी निवेदन सादर केले नाही किंवा चौकशी अधिका—याकडे व्यक्तीशः हजर झाले नाही किंवा आपण महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 मधील तरतुदींचे/आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केला/नकार दिला तर चौकशी अधिका—यास आपणाविरूध्द एकतर्फी चौकशी चालू करता येईल. आपणास असेही निर्देशित करण्यात येते की, कोणत्याही बाबतीत शासकीय कर्मचा—याला त्यांच्या शासकीय सेवेसंबंधीच्या कोणत्याही बाबतीत राजकीय अथवा बाहय दबाब आणता येणार नाही किंवा आणण्याचा प्रयत्न करता येणार नाही. याबाबतीत आपल्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून या शिस्तभंगविषयक कार्यवाहीसंबंधात अभिवेदन आल्यास आपणास असे अभिवेदन केल्याची माहीती होती व ते आपल्या सांगण्यावरून करण्यात आलेले आहे असे गृहीत धरण्यात येईल व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य पोलीस
विभागीय चौकशी
लोहमार्ग पोलीस दल

## आदेश

क्रमांकः–पोअलोना / विचौ / पोहवा–243 / 2016 नागपूर, दि. / 01 / 2016

**अपचारीचे नांव व पदनाम** :–पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी, सध्या नेमणूक रेपोस्टे. गोंदिया

**वाचा** :–1) अपचारी पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी यांचे विरुध्द घेण्यांत आलेल्या विभागीय चौकशीची कागदपत्रे

2) चौकशी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग, मनमाड यांनी सादर केलेला विभागीय चौकशीचा समारोप अहवाल दि. 31 / 01 / 2015

3) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक कक्ष 28 सी / 585 व 243 / 5386 / 2015, दि. 19 / 06 / 2015

4) पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी यांचे स्पष्टीकरण दि. 25 / 07 / 2015

5) पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी यांचा घेतलेला आज्ञांकित कक्ष दि. 28 / 10 / 2015

**दोषारोप–1:–** तुम्ही शस्त्रागार प्रमूख म्हणुन काम करता, शस्त्राची देवाण–घेवाण करण्याचे काम तुमचे आहे. तुम्ही दि. 19 / 02 / 2014 ला सकाळी 06 / 45 पासून कर्तव्यावर आले नाही. त्यामुळे तुमचे मदतनिस पोशि / 585 लाउतकर हे पोहवा / 427 राजेश भागडीकर यांचे कडून 9 एमएम. पिस्टल जमा करुन घेत असतांना त्यांचे हातुन गोळी फायर होवून पोहवा / 427 भागडीकर यांचा मृत्यू झाला. जर आपण प्रमुख या नात्याने हजर असता तर ही घटना घडली नसती.

2:– तुम्ही दि. 19 / 2 / 2014 ला कर्तव्यावर हजर असल्याचे भासविणेकरीता क्वार्टर गार्ड रुममध्ये ठेवलेली चाबी रजिष्टरमध्ये ओव्हर रायटींग करुन शस्त्रागार तुम्ही उघडले व गैरहजर नव्हते हे दाखविण्याचा प्रयत्न केला.

उपरोक्त दोषारोपावरुन आपणास दि. 19 / 06 / 2015 रोजी **सेवेतून काढून टाकणे** (Removal from service) ही शिक्षा प्रस्तावित करून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर कारणे दाखवा नोटीस आपणास दि. 23 / 06 / 2015 रोजी प्राप्त झाली. कारणे दाखवा नोटीसला स्पष्टीकरण देण्यास्तव मुदतवाढ मिळण्यास्तव आपण विनंती केली व दि. 25 / 07 / 2015 रोजी आपले स्पष्टीकरण सादर केले जे की विचारात घेण्यात आले. आपणास दि. 28 / 10 / 2015 रोजी आज्ञांकित कक्षात बोलावून आपले म्हणणे समक्ष ऐकून घेण्यात आले.

आपण आपल्या स्पष्टीकरणात नमुद केले आहे की, घटना स्थळी आपण नव्हताच. तसेच संयुक्त विभागीय चौकशी प्रकरणात आपणास साक्षदार म्हणून लादण्यात आलेले आहे. एकाच प्रकरणात अपचारी असलेल्या व्यक्तीला सरकारी साक्षदार म्हणून ठेवणे म्हणजेच संपूर्ण विभागीय चौकशी नियमबाहय पध्दतीने चालविणे आहे. पुढे आपण काही नियमांचा आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी आपण काही वेळा गैरहजर राहील्याच्या कसुरीवरुन आपणावर सदोष मनुष्यवधाचा आरोप ठेवून शिक्षेचा प्रस्ताव ठेवला असे नमूद केले आहे. आपणास दोन मुली असून मोठी मुलगी एमबीएला शिक्षण घेत आहे तर दुसरी मुलगी कॅसरने पिडीत असून उपचार घेत आहे, पत्नीच्या देखील पोटाची कठीण शस्त्रक्रिया झालेली आहे असे नमूद करुन शिक्षेचा प्रस्ताव रद्द होईल अशी आशा बाळगतो म्हणून नमूद केले आहे.

दि. 28 / 10 / 2015 रोजी आज्ञांकीत कक्षात देखील आपण वरील बाबींचाच उल्लेख केला आहे. आपण घटनेच्या दिवशी घटना स्थळावर हजर नव्हतेच असे आपण सांगितले आहे.

आपले म्हणणे मुळीच मानण्याजोगे नाही. कारणे दाखवा नोटीस सोबतच आपणास विभागीय चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या समारोप अहवालाची प्रत देण्यात आली आहे. आपल्या अनुपस्थितीमुळेच आपले सहाय्यक पोशि / 585 एकनाथ लाऊतकर यांनी शस्त्र गलथानपणाने हाताळले व त्यात शस्त्रातून गोळी सुटून एक कर्मचारी मृत्यूमुखी पडता. या सर्व प्रकारास आपली कर्तव्यावरुन अनधिकृत अनुपस्थिती कारणीभूत ठरली. एवढेच नाही तर आपण आपली अनुपस्थिती लपविण्याकरीता क्वार्टर गार्ड रुममध्ये असलेल्या चाबी रजिस्टरमध्ये ओव्हररायटींग करुन आपण उपस्थित होता हे दर्शवून वरिष्ठांच्या डोळयात धूळ झोकण्याचा प्रयत्न केला. आपले म्हणणे मुळीच पटण्याजोगे नाही. यावरून आपणास यापुढे पोलीस दलात ठेवणे मुळीच योग्य होणार नाही असे माझे ठाम मत झाले असून मी अनंत रोकडे, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, नागपूर, सक्षम प्राधिकारी म्हणुन याद्वारे खालीलप्रमाणे अंतिम आदेश देत आहे

## अंतिम आदेश

पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी, सध्या नेमणूक रेपोस्टे. गोंदिया यांना हा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांक व वेळेपासून **सेवतून काढून टाकणे** (Removal from service) ही शिक्षा देण्यात येत आहे.

पोहवा / 243 रामचंद्र कालीदास मडावी, सध्या नेमणूक रेपोस्टे. गोंदिया हे या आदेशामुळे व्यथित होत असल्यास ते हा आदेश प्राप्त तारखे पासून 60 दिवसाचे आंत अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. रा. मुबंई यांना अपील अर्ज सादर करु शकतात.

भाग–7
मयत

क्रमांकः– पोअलोना/आस्थापना/ पोहवा–227 /2016 360 नागपूर, दि 12/01/2016

# आदेश

पोहवा/227 नरेंद्र चाफले, नेमणुक रेपोस्टे बडनेरा हे कर्क रोग या आजाराने पीडित असुन दिनांक 18.02.2015 पासुन सीक मेमो घेवुन कॅन्सर हॉस्पीटल सेवाग्राम वर्धा येथे औषधोपचार दरम्यान दिनांक 28.12.2015 रोजी 21.50 वाजता मरण पावन्याने त्यांचे नांव दिनांक 28.12.2015 चे मा. नंतर पासुन लोहमार्ग, नागपुर जिल्हयाच्या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

( अनंत रोकडे )
पोलीस अधिक्षक,लोहमार्ग,
नागपुर

प्रति :– ठाणेदार सर्व नागपूर लोहमार्ग जिल्हा
प्रत माहीतीस : अपर पोलीस अधिक्षक लोहमार्ग नागपूर/ सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी लोहमार्ग नागपूर/मनमाड /जालना
प्रभारी अधिकारी :–स्था.गु.शा. नागपूर/ भुसावळ /वाचक शाखा/जि.व्ही.शाखा/पो.नी कक्ष, रा.पो. नी पोलीस मुख्यालय /मोटार परिवहन विभाग श्वॅान पथक /बी.डी.डी.एस. कार्यालय अधिक्षक/ पत्र व्यवहार शाखा/लेखा शाखा/आस्थापना शाखा/पत्रव्यवहार लीपीक–1,5/ बि.सं. विभाग कार्यालय पोलीस अधिक्षक